रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६१ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


## कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्याबाबत कायदेशीर अभ्यासानंतर निर्णय

# मुख्यमंत्री कायद्याचे अभ्यासक,त्यामुळे ते निर्णय घेण्यास सक्षम-गिरीश महाजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक(वृत्तसंस्था)**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने एका प्रकरणामध्ये २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. यानंतर विरोधकांकडून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात वरिष्ठ नेते कायदेशीर अभ्यास करून निर्णय घेतील, असे जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. हा प्रश्न तांत्रिक बाबीत अडकला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः याकडे लक्ष ठेवून आहेत, असेही ते म्हणाले.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिला हप्ता लाभार्थ्यांना देण्यासाठी शनिवारी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासह नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबतही भाष्य केले.

माणिकराव कोकाटेंबाबत कायदेशीर बाब आणि तांत्रिक बाब आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री लक्ष ठेवून आहेत. जे नियमानुसार असेल, जे सर्वांसाठी होते ते त्यांच्यासाठी देखील होईल, असे गिरीश महाजन म्हणाले. राजीनाम्याची मागणी तर सगळेच करतात. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. अनेकवेळा कुठे काही घटना घडली, तर गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी झालेली १०० वेळा बघितली असेल, असे गिरीश महाजन म्हणाले.राजीनाम्याच्या मागण्या रोज होत असतात. पण या सर्व बाबी नियमाच्या आधीन राहुनच कराव्या लागतात. तांत्रिकदृष्ट्या सर्व बाब तपासली जाईल आणि त्यानंतरच राजीनामा घ्यायचा की नाही, यावर निर्णय होईल. मुख्यमंत्री हे कायद्याचे अभ्यासक आहेत, त्यामुळे ते निर्णय घेण्यास सक्षम आहेत. दोन्ही उपमुख्यमंत्री देखील अतिशय अनुभवी आहेत. अधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घेतील, असे गिरीश महाजन यांनी सांगितले.गिरीश महाजन यांनी नाशिकच्या पालकमंत्रीपदाबाबतही भाष्य केले. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कमी कालावधी राहिला आहे. पालकमंत्री नियुक्त करण्यासही उशीर झाला आहे. गृहमंत्री अमित शाह पुण्याच्या दौऱ्यावर आहेत. सकाळीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी त्यांची भेट घेतल्याचे समजते. या भेटीत पालकमंत्रिपदाबाबत चर्चा झालीच असेल. येत्या दोन दिवसांतच हा तिढादेखील सुटेल, असा आशावाद गिरीश महाजन यांनी व्यक्त केला. पालकमंत्री कोण होईल याबाबत विचारले असता, देवाच्या मनात असेल तसे होईल, असे ते म्हणाले.



# कंधार तालुक्यातील शिक्षक क्षमता वृद्धि २.० प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा पूर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने जिल्हा परिषदेसह सर्वच शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड यांच्या माध्यमातून गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कंधार यांच्या पर्यवेक्षणात सदरील शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा कंधार येथे यशस्वीपणे राबविण्यात आला.

कंधार तालुक्यातील स्वामी रामानंद तीर्थ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बाळंतवाडी येथे कंधार तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांसह , खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक क्षमता वृद्धीसह, सक्षमीकरणासाठी मा. संजय यरमे (गटशिक्षणाधिकारी ) पं.सं.कंधार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले होते. दुसऱ्या टप्प्यात तालुक्यातील ३५० शिक्षकांचे क्षमता वृद्धी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. त्यातील उपस्थित शिक्षक प्रशिक्षणार्थींना राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची वैशिष्टये, राज्य अभ्यासक्रम आराखडा (५+३+३+४) संरचना शालेय शिक्षण व क्षमता आधारित मुल्यांकन– संकल्पना, क्षमताधिष्ठीत अध्ययन निष्पत्तीवर आधारीत प्रश्न निर्मिती कौशल्य, विद्यार्थ्यांचे समग्र प्रगतिपत्रकातील नोंदी, यांसह शालेय गुणवत्ता मुल्यांकन व आश्वासन आराखडा कसा पूर्ण करावा याविषयी व्यवस्थीत मार्गदर्शन करण्यात आले. सदरील विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड यांच्या वतीने माध्यमिक स्तरावर तज्ञ सुलभक म्हणून रविराज केसराळीकर, शिवसांब गणाचार्य, बाबाराव विश्वकर्मा, माधव केंद्रे, विक्रम शिंदे, साहेबराव शिंदे, शिवकुमार कनोजवार, फिरदोस शेख यांनी यशस्वीपणे मार्गदर्शन केले. तर प्राथमिक स्तरावर एकनाथ केंद्रे, दत्तात्रय कदम, चांदोबा कळकवणे, नवनाथ बोळकेकर,मन्मथ पांडागळे,अमृत पौळ, रोहिणी माने यांनी तज्ञ सुलभक म्हणून मार्गदर्शन केले. सर्व प्रशिक्षणार्थींना सकाळी व दुपारी दोन वेळा चहा, शुद्ध पाणी व दुपारच्या भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आलेली होती. मा.संजय यरमे गटशिक्षणाधिकारी पं.सं.कंधार हे स्वतः उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेत होते. सदरील प्रशिक्षण समन्वयक म्हणून मा.वसंत मेटकर (शि.वि.अ.),मा.बालाजी केंद्रे (कें. प्र.), मा.ईक्बाल शेख (कें. प्र.), यांनी काम पाहिले. तर प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी शिद्धेश्वर मलगीरवार, (विषय तज्ञ), ओमप्रकाश येरमे (विषय तज्ञ), प्रशांत नरहरे (विषय तज्ञ) व गटसाधन केंद्रातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# श्री क्षेत्र चोंडी येथे तीन दिवसीय कीर्तन महोत्सव व यज्ञ सोहळा उत्साहात पार पडला



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धारूर । प्रदीप मुंडे**

सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थान स्थापना वर्धापन दिनानिमित्त (मंगळवार १८ ते गुरुवार २० फेब्रुवारी) दरम्यान किर्तन महोत्सव व यज्ञ सोहळ्याचे आयोजन श्रीक्षेत्र चोंडी येथे करण्यात आले होते. या कीर्तन महोत्सवाचा पंचक्रोशीतील व राज्यातील हजारो भाविकांनी लाभ घेतला.

या कीर्तन सोहळ्यामध्ये दोन दिवस रात्री ८ ते १० या वेळेमध्ये अनुक्रमे मंगळवार रोजी हरिहर महाराज दिवेगावकर तर बुधवारी अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन पार पडले. तर २० फेब्रुवारी गुरूवारी सकाळी चंद्रशेखर बाबांची पालखी घेऊन मिरवणूक झाली. व ११ ते १ वाजल्याच्या दरम्यान महंत आप्पासाहेब महाराज चौरे यांचे काल्याचे कीर्तन झाले. तद्नंतर पंचक्रोशीतील मेडिकल, इंजीनियरिंग ची प्रवेश परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांचा तसेच नव्याने नोकरीस लागलेल्या गुणवंतांचा चंद्रशेखर बाबा गुणरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभस्हस्ते सन्मान करण्यात आला.या महोत्सवाची सांगता काल्याच्या कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले .या तीन दिवशी कीर्तन महोत्सवाचा लाभ चोंडीसह परिसरातील हजारो भाविकांनी घेतला. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी चोंडी

# छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन विषयावर भित्तिपत्रकाचे प्रकाशन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील शंकरनगर येथील श्री.मधुकरराव बापूराव पाटील खतगावकर महाविद्यालयात लोकप्रशासन विभागाच्यावतीने दि. १८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रशासन या विषयावरील भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. लोकप्रशासन विभागाच्यावतीने प्रशासननामा या भित्तीपत्रकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने लोकप्रशासन विषयाच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोककल्याणकारी प्रशासनाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या प्रशासकीय पैलूंवर प्रकाश टाकणारा लेखसंग्रह भित्तिपत्रकाच्या माध्यमातून प्रकाशित केला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे महसूल प्रशासन, अष्टप्रधान मंडळ, त्यांचे न्याय प्रशासन अशा विविध प्रशासकीय पैलूंविषयी विद्यार्थ्यांनी या भित्तिपत्रकात अभ्यासपूर्ण लेखन केले आहेत. लोकशाही शासनप्रणाली आसलेल्या राज्याला देखील छत्रपती शिवरायांचे प्रशासन दीपस्तंभासारखे कसे मार्गदर्शक आहे हे विद्यार्थ्यांनी या भित्तीपत्रकातून मांडले आहे. भित्तिपत्रकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटोदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हेमंत बक्षी, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. दयानंद माने, मराठी विभाग प्रमुख डॉ. शरदचंद्र देगलूरकर, हिंदी विभाग प्रमुख डॉ. पुरभाजी भुमरे, वाणिज्य विभागातील प्रा.डॉ चंद्रकांत गजेवाड इत्यादी मान्यवर उपस्थित होते.त्याचबरोबर या भित्तीपत्रकासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ.शंकर लेखणे प्रा. ज्ञानेश्वर कोकणे उपस्थित होते. तसेच या भित्तीपत्रकाचे संपादक मंडळातील सदस्य गंगाधर दावलेकर ,सहदेव सूर्यवंशी ,गणेश मुंडकर,साईप्रसाद मांजरमे, शंकर शिरगिरे कु. स्वाती वाघमारे , कु.बावणे धनश्री निकिता गोदमगावे, कु.वैष्णवी बावणे, कु.प्रियंका वडजे इत्यादी विद्यार्थी याप्रसंगी उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री मा.अजित पवार यांच्या उपस्थितीत

# शेकडो कार्यकर्त्यांसह मा.आ.मोहन हंबर्डे २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये पक्ष प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

दक्षिण नांदेड चे माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश येत्या २८ फेब्रुवारी रोजी उप मुख्यमंत्री अजित दादा पवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्हातील आपल्या पुढील राजकीय वाटचालीस सुरुवात होणार आहे अशी माहिती नांदेड दक्षिणचे माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे यांनी दिली नांदेड दक्षिणचा आमदार या नात्याने मी या मतदारसंघाचा संपूर्ण कायापालट करण्यात कुठेही कमी पडलो नाही मतदार संघासाठी कोट्यावधींचा विकास निधी उपलब्ध करून दिला म्हणेल त्या व्यक्तीची काम ताबडतोब करून दिले जनतेनेही मला भरभरून प्रेम दिले यापुढेही त्यांचे आशीर्वाद प्रेम असेच कायम राहील असा विश्वास व्यक्त केला तसेच मोहनराव हंबर्डे म्हणाले राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक वाढीसाठी मी यापुढे प्रयत्नशील राहणार आहे यापूर्वीही मी राष्ट्रवादीमध्ये कार्यरत होतो शिवाय पक्षाने मला २००७ मध्ये पंचायत समिती उपसभापती पदी विराजमान केले होते माझे असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी माझ्यासोबत असून सर्वांना सोबत घेऊन जिल्हात राष्ट्रवादी काँग्रेस ला बळकटी मिळवून देण्यासाठी अहोरात्र परिश्रम करण्याची माझी तयारी आहे आगामी महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला घवघवीत यश मिळेल असा आत्मविश्वास मोहनराव हंबर्डे यांनी व्यक्त केला २८ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ओम गार्डन नांदेड येथे पक्षप्रवेश सोहळा असून यावेळी असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी माजी जिल्हा परिषद सदस्य माजी नगरसेवक सरपंच उपसरपंच माझ्यासोबत राष्ट्रवादीमध्ये दाखल होणार आहेत या पक्षप्रवेश सोहळ्यानिमित्त माझ्या सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मोहन अण्णा हंबर्डे यांनी केले





**मातृतीर्थ सिंदखेड राजा चे तहसीलदार अजित दिवटे यांना जन्मदिनानिमित्त शुभेच्छा देतांना लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत, सिंदखेड राजा मिरर चे संपादक राहुल झोटे व रा.काँ. चे शहराध्यक्ष सिद्धार्थ जाधव. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा)**



# राज्यात मराठी कधी रोजगाराची भाषा होणार ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

महाराष्ट्र ही मराठी भाषिकांची भूमी असली तरी मराठी भाषेची स्थिती रोजगाराच्या संधींमध्ये दुय्यम ठरली आहे. शासन वेळोवेळी मराठी भाषा जपण्यासाठी परिपत्रके काढते, भाषणात मराठीचा गौरव केला जातो, पण प्रत्यक्षात मराठी भाषिकांना सरकारी आणि खाजगी नोकऱ्यांमध्ये इंग्रजीसमोर दुय्यम स्थान दिले जाते. इंग्रजी भाषेचे महत्त्व कोणी नाकारत नाही, पण फक्त इंग्रजीच्या आधारावर गुणवत्तेचे मोजमाप करणे ही चुकीची पद्धत आहे. त्यामुळे मराठी भाषिकांना रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी समाज, सरकार आणि शिक्षण क्षेत्राने धोरणात्मक बदल करण्याची गरज आहे.

**मराठी भाषेची सद्यस्थिती आणि रोजगाराचे आव्हान**

१. शिक्षणात मराठीचा प्रभाव, पण रोजगारात इंग्रजीची सक्ती
महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी आजही मराठी माध्यमातून शिक्षण घेतात. अनेक नामवंत विद्यापीठे मराठीमध्ये पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण देतात. परंतु, जेव्हा हेच विद्यार्थी नोकरीसाठी अर्ज करतात, तेव्हा त्यांच्यावर इंग्रजीतून संवाद साधण्याची सक्ती केली जाते. त्यामुळे गुणवंत उमेदवार देखील फक्त इंग्रजी कमकुवत असल्याने मागे पडतात.

२. मराठी माध्यमातून शिकलेल्या विद्यार्थ्यांना संधी नाकारणे
आज अनेक विद्यार्थी छ्एढ/डएढ, च.झहळश्र., झह.ऊ सारख्या उच्च शिक्षणाच्या परीक्षांमध्ये यश मिळवतात. पण जेव्हा ते महाविद्यालये किंवा विद्यापीठांमध्ये प्राध्यापकपदासाठी मुलाखतीला जातात, तेव्हा त्यांना इंग्रजीतून प्रश्न विचारले जातात. मुलाखत घेणारे अधिकारी किंवा प्राध्यापक स्वतः मराठी माध्यमातून शिकलेले असतात, पण तेच उमेदवारांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती करतात. परिणामी, उमेदवारांचा आत्मविश्वास खचतो आणि त्यांना नोकरी मिळत नाही.



३. इंग्रजीचा अनावश्यक अडथळा आणि संधी हिरावणे
इंग्रजी भाषेचे महत्त्व कोण नाकारत नाही, पण ते रोजगार मिळवण्याचा निकष असू नये. इंग्रजी फक्त संवादाचे माध्यम आहे, गुणवत्ता ठरवण्याचे साधन नव्हे. महाराष्ट्रातील अनेक सरकारी आणि खाजगी क्षेत्रांमध्ये इंग्रजी येत नसल्यामुळे पात्र उमेदवार नाकारले जातात, जरी त्यांच्याकडे सर्व शैक्षणिक पात्रता असल्या तरी.

४. शासनाच्या परिपत्रकांचा उपयोग नाही
महाराष्ट्र सरकार वेळोवेळी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी परिपत्रके काढते. यात मराठीतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना संधी द्यावी, मराठीतून प्रशासन चालवावे, सरकारी कामकाजात मराठीचा वापर वाढवावा असे आदेश असतात. पण प्रत्यक्षात या परिपत्रकांची अंमलबजावणी होत नाही.

**समाजाचा दुटप्पीपणा आणि मराठी भाषेची उपेक्षा**

१. संधी मिळाल्यावर लोक मराठीतच बोलतात, पण इतरांना इंग्रजीत बोलायला लावतात
जे लोक उच्च पदावर पोहोचतात, ते दैनंदिन व्यवहारात मराठीतूनच संवाद साधतात. पण जेव्हा नव्या उमेदवारांना संधी द्यायची वेळ येते, तेव्हा मात्र इंग्रजीचे निकष लावले जातात. हा दुटप्पीपणा दूर झाला पाहिजे.

२. इंग्रजी बोलता येते म्हणून गुणवत्तेचा निर्णय होऊ शकत नाही
गुणवत्ता ही ज्ञान, कौशल्य, आणि अनुभव यावर ठरवली पाहिजे. इंग्रजी हे ज्ञानाचे साधन आहे, पण फक्त इंग्रजी बोलण्याच्या कौशल्यावर नोकऱ्या ठरवल्या जातील, तर मराठी माध्यमातील विद्यार्थी कधीच संधी मिळवू शकणार नाहीत.

३. विद्यार्थी इंग्रजी माध्यमाकडे वळत आहेत, त्यामुळे मराठी माध्यम दुबळे होत आहे
मराठी माध्यमातून शिकलेल्यांना रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत, हे पाहून पालक इंग्रजी माध्यमाची निवड करत आहेत. यामुळे मराठी माध्यमातील विद्यार्थी संख्येत घट होत आहे. ही परिस्थिती अशीच राहिली, तर मराठी भाषा केवळ संवादापुरती मर्यादित राहील आणि शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात तिचे महत्त्व संपुष्टात येईल.

**मराठीला रोजगाराची भाषा बनवण्यासाठी उपाय**

१. मराठीतून मुलाखती आणि नोकरभरती अनिवार्य करावी
राज्यातील सरकारी आणि खाजगी क्षेत्रांमध्ये उमेदवारांना मराठीतून संवाद साधण्याची संधी द्यावी. मुलाखती आणि परीक्षा मराठीतून घेण्याचा नियम सक्तीने पाळला गेला पाहिजे.

२. मराठीतून उच्च शिक्षण आणि संशोधनाला चालना द्या
संशोधन, अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान विषय मराठीतून शिकता यावेत, यासाठी सरकारने धोरणे राबवावी. खखढ, खखच् आणि –खखचड सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये मराठीतून अभ्यासक्रम सुरू करावेत.

३. मराठी नोकरी हमी कायदा लागू करावा
कर्नाटकमध्ये कन्नड नोकरी हमी कायदा लागू करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही मराठी भाषिकांसाठी नोकरीत आरक्षण आणि संधी सुनिश्चित करणारा कायदा लागू करावा.

४. मराठी आणि इंग्रजी यामध्ये समतोल राखावा
विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकणे महत्त्वाचे आहे, पण तेच नोकरीसाठी अनिवार्य नसावे. शिक्षण संस्थांनी सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना दोन्ही भाषांमध्ये गती मिळवण्याचे प्रशिक्षण द्यावे.

**थोडक्यात – मराठीला रोजगाराची भाषा करणे ही काळाची गरज**

१. केवळ शासनाच्या परिपत्रकांनी काही साध्य होणार नाही.
२. शिक्षण, नोकरी, आणि प्रशासनात मराठीला महत्त्व मिळाले पाहिजे.
३. समाजाने मराठीत संवाद साधणाऱ्या आणि मराठीत काम करणाऱ्या लोकांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

जर योग्य धोरणे राबवली नाहीत, तर महाराष्ट्रातच मराठी माणूस उपेक्षित राहील आणि मराठी भाषा केवळ घरगुती संवादापुरती मर्यादित राहील. म्हणूनच, शासन, समाज, आणि उद्योग क्षेत्राने एकत्र येऊन मराठीला रोजगाराची भाषा बनवण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत.

मराठी ही केवळ संवादाची भाषा नव्हे, तर ती रोजगाराची भाषा बनली पाहिजे!

**–डॉ.सुवर्णा कराड प्रदेशाध्यक्षा वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र**



नांदेड जिल्ह्याचे भूमिपुत्र*विकासासाठी सतत धडपड करणारे,*सहकाराची वेल वाढवणारे,*शेतकऱ्यांच्या, तरुणांच्या भविष्याचा वेध घेउन,*सतत कार्यमग्न असणारे*उद्योगी नेतृत्व..*आदरणीय श्री. मारोतराव पाटील कवळे गुरुजी.नादेड (लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)

# देगलुर येथे शिव जन्मोत्सव उल्हासात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलुर । मधुकर शिरेवार

१९ फेब्रुवारी रोजी देगलुर मधे सकाळी नऊ वाजता शिवरायांचे पुजन आमदार जितेश भाऊ अन्तापुरकर, जन्मोत्सव समिती अध्यक्ष मंगल पाटील , शिवस्मारक अध्यक्ष अंकुश देसाई , मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी करून.शिव जन्मोत्सव कार्याध्यक्ष डॉ. सुनिल जाधव यांनी जिजाऊ वंदना गायन करून मानवंदना देऊन यानंतर शिव जन्मोत्सव पाळणा गायन डॉ. सुनिल जाधव कार्याध्यक्ष यांनी वैशाली सुनिल जाधव , डॉ. मोना चौडेकर, ज्योती महागावे , योजना शिंदे , संग्राम कावळगावकर , मारोती यनावार , यांच्या सह करून जन्मोत्सव उल्हासात साजरा झाला.तहसीलदार भरतजी सुर्यवंशी, बी.डी. ओ. शेखर देशमुख , निव्रुतिजी कांबळे ,




माजी नगराध्यक्ष शंकरजी कन्तेवार, लक्ष्मीकांतजी पदमवार , मोगलाजी शिरसेटवार , माजी सभापती माधवरावजी मिसाळे ,अँड. रामराव नाईक , शिवाजीराव देशमुख, अँड प्रितमजी देशमुख , महेश जी पाटील , नागनाथ वाडेकर , धोंडिबाजी कांबळे , नितेश पाटील ,जनार्दन बिरादार , डॉ. प्राप्ती व डॉ . निवृत्ती तेलंग , उपाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे , सचिव राजुजी पाटील मलकापुरकर , संपादक सुनील मद्रुरे , प्रशांत दासरवार , बबलु टेकाळे ,पिंटू पाटील , अनिल कदम सर , कार्याध्यक्ष कैलास येसगे कावळगावकर , राजुजी ढोसनीकर , बालाजी थडके , नामदेव थडके, रमेशजी जाधव, विठ्ठलराव भोसले ,बालाजी जाधव ,सदाशिव शिंदे , शशांक पाटील , दिलीप थडके, राहुल थडके ,बालाजी शहापूरकर , रुपेश पाटील, रमेश पाटील , राजु थडके , उमाकांत भुताळे, शिवा डाकोरे, विशाल पाटील, गजु पाटील ,शेख असलम, प्रशांत पाटील , डॉ मुंडे, डॉ भूमे, डॉ आलुरकर ,डॉ इंगोले ,व्यंकटजी कांबळे, अशोक जी कांबळे , शिवाजी थडके ,रमेश घुळेकर , दिलीप भडके , शिला देसाई,वैशाली जाधव – सागावे , डॉ मोना ओव्हाळ , नंदा देशमुख, संजीवनी सुर्यवंशी, चैतन्या वानखेडे, रंजना मानुरे, मधुमती घोंगडे ,ज्योति वरखिंडे सह सर्व समाज बांधव , राजकीयपक्ष , सामाजिक पदाधिकारी , महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या डॉ. सुनिल जाधव यांनी सुत्र संचालन केले . शिवगीत व स्फूर्ती गीत गायन करून वातावरण शिवंमय ऊर्जा युक्त बनुन विविध कार्यक्रम युक्त मोठ्या उत्साहात तीन दिवसीय शिव जन्मोत्सव संपन्न झाला . आभार अध्यक्ष मंगल पाटील यांनी मानले



दि २२ फेब्रुवारी रोज शनिवारी श्री गणेश मंदिर मोंढा मुदखेड येथे नांदेड जिल्ह्याचे लोक कल्याणकारी नेते श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी दर्शन घेतले. श्री गणेश मंदिर कमिटीच्या वतीने कवळे गुरुजी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री अनिल काचावार,श्री आऊलवार सावकार, श्री चंद्रे साहेब, मंदिराचे पुजारी उपस्थित होते.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)

# मरखेल गावठाणच्या सार्वजनिक भूखंडा वर सरपंचाच्या भावाचे अतिक्रमण हटाव

## अमरण उपोषणचा इशारा बळीराम नामावाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर । जयपाल दावनगीरकर

देगलूर तालुक्यातील मरखेल येथील मागासवर्गीय समाजासाठी शासनाने इ. सन १९९३ ला गट नंबर ४४८/१ मध्ये क्षेत्रफळ २ हेक्टर ९६ आर जमीन भूखंड पाडून प्लॅट्स वाटप करण्यात आले होते सदर वसाहतीत मागासवर्गीय समाजांच्या सार्वजनिक कार्यक्रमाची व महापुरुषांच्या जयंती उत्सव साजरा करण्यासाठी प्लॉट क्रमांक १३०, १३१, १३२ ज्यांची लांबी ३० बाय ३० मीटर चा भूखंड शासनाने सार्वजनिक उपक्रमासाठी आरक्षित ठेवला आहे सदर प्लॉटवर सध्याचे विद्यमान सरपंच यांचे भाऊ पांडुरंग शंकर गवाले यांनी सुमारे दोन प्लॉटवर अतिक्रमण करून पक्क्या स्वरूपाचे बांधकाम केले आहे हे अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे म्हणून सामाजिक कार्यकर्ते बळीराम नामावाड यांनी ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती त्या निवेदनाला केराची टोपली दाखवली असल्याने दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर अमर उपोषण बसण्याचा इशारा बळीराम नामावाड यांनी दिला होता



यावरून ग्रामविकास अधिकारी येंडे यांनी दोन दिवसात अतिक्रमण काढण्याचे आश्वासन दिले होते ते अतिक्रमण अद्यापही काढले नसल्यामुळे बळीराम नामावाड यांनी १० मार्च २०२५ रोज सोमवार या दिवशी तहसील कार्यालय समोर अमरण उपोषण बसण्याचे निवेदन मा.उपजिल्हाधिकारी देगलूर, तहसीलदार देगलूर, गटविकास अधिकारी पं.स.देगलूर यांच्याकडे दिली आहे.

विशेष म्हणजे उपोषण करते हे ६५ वर्षाचे असून त्यांना बी.पी., शुगर यांचा आजार असल्यामुळे यातून त्यांच्या जीवितास बरे वाईट झाल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात यावी अशी पूर्व सूचना दिली आहे. यावरून तहसील व पंचायत समिती प्रशासनाकडून संबंधित ग्रामविकास अधिकारी व सरपंचांना लेखी आदेश दिल्याचे सांगितले आहे यावरून ग्रामस्थांमध्ये गाव ते दिल्लीपर्यंत सत्ता मध्ये जो आहे तो शासनाच्या भुखंडावर डोळा ठेवत असतो अशी लोकांमध्ये चर्चा दिसून येत आहे.



लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी हे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या सोबत विकास कामाची चर्चा करतेवेळी (लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)

# बहुजन साहित्य संघच्या साहित्य संमेलना ची सहावी बैठक संपन्न






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । प्रतिनिधी

दि. २० फेब्रुवारी ब.सा.संघाच्या वतीने सिंदखेड राजा येथे एक तातडीची छोटेखानी बैठक घेण्यात आली. त्यामध्ये बहुजन साहित्य संघाच्या ३१ मार्च, २०२५ रोजी मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे नियोजित असलेल्या सहाव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या सोहळ्यासाठी स्थानिक मान्यवरांच्या भेटी घेऊन संमेलनासाठी निमंत्रण देण्या संदर्भात व संमेलन संपन्नतेच्या विविध बाबींवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत स्थानिक आमदार तसेच सामाजिक व राजकीय मान्यवरांची भेट घेऊन चर्चा करणे व त्यांना निमंत्रित करण्याचे ठरवण्यात आले. संमेलनासाठी स्थळ उपलब्ध करून दिल्याबद्दल मा. शिवप्रसाद ठाकरे यांना धन्यवादाचे पत्र या बैठकीनंतर मातोश्री मंगल कार्यालय येथे त्यांना देण्यात आले. सदर बैठकीसाठी ब. स. संघाचे अध्यक्ष ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे, दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत, डॉ. डी. खरात. डॉ. बबनराव महामुने, भावकवी अंकुशराव पडघान. हे उपस्थित होते.



लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब व शिवसेना शहरप्रमुख यांचा दैनिक लोकनेता चे पत्रकार बालाजी पाटील शिंदे यांनी पिंपळदरी येथे केले सन्मानित.(लोकनेता न्युज नेटवर्क कापसी)

# विज कामगारांच्या मागण्यासाठी वर्कर्स फेडरेशनची द्वारसभा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतमराव बनसोडे**

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेच्या वतीने तिन्ही वीज कंपन्यातील मुख्य कार्यालय पातळीवरील तांत्रिक व इतर कामगारांच्या प्रलंबित २४ मागण्या करीता दिनांक २१ फरवरीला २०२५ ला चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्रभर व नांदेड येथे द्वारसभा व निदर्शने झोन,सर्कल व विभाग कार्यालय समोर हजारो कर्मचारी अभियंते व आऊटसोर्सिंग कामगार यांनी केली. या आंदोलनाची यापूर्वीच म.राज्य वर्कर्स फेडरेशने नोटीस दिली होती.महाराष्ट्रभर या आंदोलनाचे नेतृत्व कॉम्रेड मोहन शर्मा, सी.एम.देशमुख,कृष्णा भोयर महेश जोतराव यांनी केले.

तर नांदेड येथील द्वार सभा कॉम्रेड पी.एन.तेलंग केंद्रीय कार्यकारणी सदस्य, कामगार नेते कॉ.विजय रणखांब प्रसिद्धी प्रमुख नांदेड झोन,यांचे नेतृत्वात घेण्यात आली. यावेळी कॉ.शेख अहमद सहसचिव नांदेड झोन,कॉ.राजेश आरेकर उप–व्यवस्थापक (विवले),कॉ.लोखंडे उप व्यवस्थापक (विवले), कॉ. सुनील कुंटूरवार सहाय्यक लेखापाल, कॉ. श्रीराम ढगे सहसचिव ग्रामीण विभाग, कॉम्रेड महेश स्वामी उपाध्यक्ष ग्रामीण विभाग नांदेड, कॉ.बी.बी. वाघमारे, कॉ.चेतन पालेपवाड ,कॉ.अशोक कल्याणकर, इतर सर्व कर्मचारी सभासद उपस्थित होते.



महावितरण कंपनीत कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास निश्चित करणे, कर्मचाऱ्यांचे वर्क नॉर्म्स निश्चित करणे, वसुली बाबत होत असलेली दडपशाही बंद करणे, वसुलीची जबाबदारी सर्व संबंधितावर निश्चित करून सुधारित परिपत्रक काढणे,वीज कंपन्यातील ४२००० च्या वर कंत्राटी कामगारांना जेष्ठता यादीनुसार कायम करण्यात यावे,तिन्ही वीज कंपन्यातील ३२००० रिक्त जागा भरणे,महावितरण कंपनीची ३२९ उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देण्याची काढलेले निविदा रद्द करणे,तांत्रिक व आतांत्रिक पदांचे पदोन्नती पॅनल तातडीने घेणे,मयत कामगाराच्या वारसाचे प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, नवीन निर्माण झालेल्या महानगरपालिका शाखा कार्यालय कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक निर्माण करणे,वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करणे,ईपीएफ–९५ पेन्शन लागू करणे,यंत्रचालक व तांत्रिक कर्मचारी यांचा अन्यामलीचा विषय मार्गी लावणे,तिन्ही वीज कंपन्या बदली धोरण निश्चित करणे,विद्युत व इतर सहाय्यक यांचा तीन वर्षाचा कालावधी सेवानिवृत्ती उपदान व प्रथम सामान्य आदेश–७४ करीता ग्राह्य धरणे, मेडिक्लेम पॉलिसी बाबत असलेल्या तक्रारी दूर करणे, महापारेषण कंपनीतील हॉट लाईन युनिटमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे हॉटलाइन भत्ता लागू करणे,अंतर्गत भरती करीता राखीव असलेले पदे भरणे इत्यादी मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. पुढील आंदोलन २७ फरवरीला झोन कार्यालयासमोर करण्यात येणार आहे. यानंतर प्रशासनाने चर्चा करून मान्य मागणी न झाल्यास ६ मार्चला एक दिवसाच्या संपावर ८५००० कर्मचारी, अभियंते,अधिकारी व आऊटसोर्सिंग कामगार जाणार आहेत.

# स्वराज्य सप्ताह निमित्त उमरी शिवरायाच्या पुतळयाजवळ दिपोत्सव व स्मारक स्वच्छता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**



उमरी महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या वतीने सपुर्ण महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने सपुर्ण महाराष्ट्रभर स्वराज्य सप्ताह चे आयोजन करण्यात आले आहे प्रदेश कार्यकारणी च्या सूचनेनुसार जिल्ह्यात आ प्रतापराव पाटील चिखलीकर , जिल्हाध्यक्ष दिलीपरावजी बरबेडकर याच्या नेतृत्व खाली जिल्हा भर स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या संदर्भात उमरी येथे पक्ष कार्यालयात प्रदेश सरचिटणीस डॉ विक्रम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच एक बैठक घेण्यात आली या बैठकीत पक्षाने सुचविल्याप्रमाणे सात दिवसीय कार्यक्रम राबविण्याचे ठरविण्यात आला या पहिल्या दिवशी उमरी तालुका युवक राष्ट्रवादीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसराची स्वच्छता दिपोस्तव अभिवादन कार्यक्रम , बाल शिवाजी तयार करणे शिवाजी महाराजांची फोटो वाटप करणे , रांगोळी स्पर्धा , विद्यार्थी राष्ट्रवादी च्या वतीने वक्तृत्व स्पर्धा , निबंध स्पर्धा सभासद नोंदणी इ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आयोजन प्रमाणे आज शिवजयंतीच्या निमित्त ने युवक राष्ट्रवादीच्या वतीने सायंकाळी ६ वाजता महाराजाच्या पुतळा परिसराची स्वच्छता करण्यात आली महाराजाच्या पुतळ्या सभोवती दीप प्रज्वलित करण्यात आले प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन काण्यात आले या प्रसंगी प्रदेशं सरचिटणीस डॉ विक्रम देशमुख सेनेचे तालुकाप्रमुख तथा माजी नगर अध्यक्ष सुभाष पेरे वार, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर कदम युवक तालुकाध्यक्ष कैलास पाटील ढगे,पारसमल दर्डा, जेष्ठ पत्रकार बी व्ही चव्हाण राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष सौ अनिता अनंतवार श्रीनिवास अनंतवार शहर अध्यक्ष सुरेखा गोकावार सहकार सेल चे जिल्हा अध्यक्ष मुझमिल बेग मोगल जिल्हा संघटक शाहीर जंटल शहर अध्यक्ष महेश पडोळे शहर युवक अध्यक्ष योगेश धुमाळे संतोष वाघमारे सामाजिक न्याय चे तालुका अध्यक्ष साहेबराव गायकवाड दयाल सिंग बावरी मोहन सिंग बावरी ,इ कार्यकर्ते उपस्थित होते

# आदर्श सरपंच संतोष पाटील सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने सन्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलुर । मधुकर शिरेवार**

देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथील सरपंच संतोष पाटील यांना नुकतेच प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथील लाल किल्ल्यातील परेडसाठी निमंत्रित केले होते. त्यांना दिल्ली येथे पंचायत राज विभागाच्या वतीने सन्मान करण्यात आले होते. यामुळे संपूर्ण नांदेड जिल्ह्याचा सन्मान देशपातळीवर झाला आहे. यासाठी काल आदर्श सरपंच संतोष पाटील यांचा सार्वजनिक शिवजयंती समिती देगलूर च्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी नांदेड चे खासदार रवींद्र चव्हाण यांनी संतोष पाटील यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला. याप्रसंगी आमदार जितेश अंतापूरकर, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मंगल पाटील, सर्व पदाधिकारी, मोगलाजी शिरशेटवार, लक्ष्मीकांत पदमवार, गट विकास अधिकारी शेखर देशमुख, मुख्यधिकारी चव्हाण सर, अंकुश देशई, महेश पाटील, बालाजी पाटील, राजु पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# अस्सल नांदेडी भाषेत राम राम सोयरे हो म्हणत विशाल पवार करतो अख्खा महाराष्ट्राला आकर्षित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण पाटील वडजे**



कमी कालावधीमध्ये ज्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या नांदेडच्या मायबोली भाषेमध्ये नांदेड जिल्हाच नाही तर अख्खा महाराष्ट्राला आपल्याकडे आकर्षित केलं असं एक ग्रामीण भागातील छोट्याशा कुटुंबातील एका छोट्या शेतकऱ्याचा मुलगा आपल्या शेतीचे काम करत करत अख्ख्या महाराष्ट्राला हसवण्याचे काम करत आहे त्याचं नाव राम राम सोयरेहो ((विशाल संतोषराव पवार)) अशा ग्रामीण भागातील कलाकाराला सामोर जायचं पाठबळ आपण सर्वांनी मिळून दिले पाहिजे कारण हळूहळू लोक आपली मातृभाषा विसरत चालले आहे अशा परिस्थितीमध्ये सुद्धा आपल्या ग्रामीण भागातला कलाकार आपल्या नांदेडची मायबोली भाषा बोलून त्याने महाराष्ट्रातील लोकांचे प्रेम आपल्याकडे आकर्षित करत आहे.

# पोखरभोसी येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कापसी । बालाजी पाटील शिंदे**

कलंबर येथून जवळच आसलेल्या लोहा तालुक्यातील पोखरभोसी येथे दि.२२ फेब्रुवारी ते १ मार्च २०२५ दरम्यान श्रीहरी श्री गुरुवर्य वैकुंठवासी मामासाहेब मारतळेकर यांच्या कृपाशीर्वादाने व वै.ह.भ.प.महाराज डांगे यांच्या प्रेरणेने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण ,श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ व लक्ष्मण शक्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताहतील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा,सकाळी ७ ते ११ गाथा पारायण दुपारी १२ ते ४ श्रीपद् भागवत कथा ,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ ,रात्री ९ ते ११ हरिकिर्तन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ज्ञानेश्वरी गाथा व्यासपीठ ह.भ.प.रंगनाथ म. ताटे,परसराम म.डांगे ,भागवत आनंदा ताटे ,ह.भ.प.प्रकाश म.डांगे व ह.भ.प.दत्ता महाराज ताटे व नित्य हरिपाठ – ह.भ.प.परसराम मोतीराम ताटे ,किशन व्यंकटी ताटे ,विठ्ठल लक्ष्मण पा.ताटे ,शिवाजी पंडीत पा.ताटे ,शंभूबूवा दिगंबर बुवा परबत ,गजानन जनार्दन डांगे व समस्त भजनी मंडळ यांच्याकडून नित्य हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे. कथा व व्यास श्री ह.भ.प. रामेश्वरजी महाराज कुबेर ( श्री श्रेत्र वृंदावन धाम ) यांच्या सुश्राव्य वाणीतून दररोज दुपारी १२ ते ४ पर्यंत श्रीपद् भागवत कथा होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहतील किर्तनकारांचे पुढील प्रमाणे किर्तन



होणार आहेत. दि. २२ फेब्रुवारी रोजी रात्री श्री ह.भ.प.किशोर महाराज सुर्यवंशी लातूरकर ,दि.२३ फेब्रुवारी रोजी रात्री श्री ह.भ.प.महादेव महाराज बोराडे शास्त्री ,श्री क्षेत्र संस्थान पावनधाम बीड , दि.२४ फेब्रुवारी रोजी रात्री श्री ह.भ.प.नामदेव महाराज रेंगे जामकर ,दि. २५ फेब्रुवारी रोजी रात्री ह.भ.प.गजानन महाराज देठे, दि.२६ फेब्रुवारी रोजी रात्री श्री ह.भ.प.सोमेश्वर महाराज पंढरपूर ( ढाळेगाव ) ,दि.२७ फेब्रुवारी रोजी रात्री श्री ह.भ.प.कृष्णा महाराज रासवे ,दि.२८ फेब्रुवारी रोजी श्री ह.भ.प.विजयानंद महाराज सुप्पेकर यांचे दुपारी ११ ते २ वाजेपर्यंत महापुजेचे किर्तन होईल व याच दिवशी सायंकाळी लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम निष्काम सेवा मंडळातर्फे होईल. ,दि.१ मार्च रोजी श्री ह.भ.प. दत्ता महाराज झाडे यांचे काल्याचे किर्तन सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत होईल त्यानंतर लगेच महाप्रसादाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या अखंड हरिनाम सप्ताहास सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन पोखरभोसी येथील ,भक्त मंडळाकडून ( नागरिकांकडून ) केले आहे.

## जे माझ्यावर टीका करीत होते आता तेच पक्ष बदलले

# अशोक चव्हाणांचे नाव न घेता आमदार चिखलीकर यांनी लगावला टोला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

माझ्यावर अनेक वारंवार टीका टिपणी करीत होते की मी पक्ष बदलणारा म्हणून पण आज तेच पक्ष बदलले आहे परंतु मी अनेक पक्ष बदललो तरी माझे सर्वांसोबत जिव्हाळ्याचे सबंध पूर्वीपासूनच असल्यामुळे मी निवडून आलो, मी कसा पराभूत होईल हा आनंद त्यांना वाटत होता पण मी सतत निवडून येत राहिलो हा आनंद माझा आहे. शिवराज पाटील होटाळकर यांनी आयोजित केलेल्या पक्ष प्रवेश सोहळा आणि सभासद नोंदणी या कार्यक्रमात अशोकराव चव्हाण यांचे नाव न घेता आ.प्रताप पा. चिखलीकर यांनी निशाणा साधला आहे. नायगाव शहरातील हेडगेवार चौक येथे राष्ट्रवादी पक्ष प्रवेश सोहळा व सभासद नोंदणी या आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी आ.प्रताप पा. चिखलीकर यासह जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, विक्रम देशमुख,वसंत सुगावे, उत्तमराव सोनकांबळे,संभाजीराव मुकनर अँड.बाळासाहेब कांबळे, रणजीत पाटील हिवराळे, दिलीप पा.चोळाकेकर, तालुका अध्यक्ष धर्माबाद अंकुश हनुमंते,यादवराव तुडमे,ज्ञानेश्वर कदम, पाटील शिंदे तालुकाध्यक्ष नायगाव,ज्ञानेश्वर सुर्यवाड,विशाल पाटील शिंदे,सचिन पाटील बेंद्रीकर,आनंद पा पवार, यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रस्ताविकातून शिवराज पाटील होटाळकर म्हणाले की, राष्ट्रवादी पक्ष हा सर्वसामान्य कार्यकर्ता यांना बळ देणारा पक्ष आहे म्हणून भोकर येथे कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश सोहळा झालेला आहे. नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी पक्ष हा आ.चिखलीकर यांचा गट म्हणून ओळखला जाईल असे आपण २४ तासांपैकी १८ तास



पक्षासाठी काम करू असेही ते म्हणाले यासह जीवन चव्हाण ,वसंत सुगावे,विक्रम देशमुख यांनीही आपले मत व्यक्त केले.आ. चिखलीकर बोलताना पुढे म्हणाले की ,येत्या २८ तारखेला आ.मोहन हंबर्डे हे देखील राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करणार आहेत, सत्यविना जमणारी मंडळी देखील आपल्या जिल्ह्यात आहे सिंचनाच्या प्रश्नावर अनेकांनी प्रश्न केला याबाबत आपण एक शिष्टमंडळ ना.अजित पवार यांना भेटून याविषयी सखोल चर्चा घडवून आणूया असे सांगत ते पुढे म्हणाले. राष्ट्रवादी पक्ष हा शिव लहू फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारा धारेवर चालणारा पक्ष आहे म्हणून आपण जोमाने काम करूया तुम्ही माझी खूप तारीफ केली परंतु मी देखील तुमच्यासारखाच कार्यकर्ता आहे असेही ते म्हणाले, सदर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व्यंकटराव पाटील शिंदे यांनी केले आहे तर यावेळी. श्रीपत पाटील शिंदे मांजरमकर,, प्रदीप पाटील पवळे गंगाजी पाटील मुगावकर, आनंदराव पाटील शिंदे ,रमेश पाटील पवार ,श्रीकांत पाटील शिंदे ,विकास पाटील धुपेकर यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी यांनी २०० कोटी १०० कोटी पन्नास कोटी असे आकडे जाहीर करून बोर्ड रंगविले परंतु निधी कुठेही खर्च करण्यात आला नाही जशास तसे रस्ते आणि नाल्या ओस पडलेले आहेत असेही आपल्या मनोगतात जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांनी आ.राजेव पवार यांचे नाव न घेता आपल्या भावना व्यक्त केल्या.

# श्री क्षेत्र उमरज येथील धार्मिक सोहळ्यास जगद्गुरु शंकराचार्य यांची उपस्थिती!

## मठाधिपती महंत एकनाथ महाराज यांची माहिती

### सात दिवस कार्यक्रम

सात दिवस श्रीमद् भागवत कथा, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर आदींचे आयोजन करण्यात आले आहे.त्यासाठी प्रशासनाचे मोठे सहकार्य मिळत आहे.यशस्वीतेसाठी ३१ समित्या करण्यात आल्या आहेत.निवास, आरोग्य, पाणी पूरवठा, दर्शन,यज्ञ,भोजन, पार्कींग आदींवर १ हजार सेवेकरी संस्थानच्या गणवेशासह राहणार आहेत २०० महिला सेवेकरी राहणार आहेत.प्रत्येक सेवेकरी यांना कामाची विभागणी करून देण्यात आली आहे.जी जबाबदारी दिली तेवढीच यशस्वी करायची आहे.

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

श्री क्षेत्र उमरज येथे श्रीसंत नामदेव महाराज मठसंस्थानाच्या वतीने १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ व कलशारोहण सोहळा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळयासह विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. दि.२७ फेब्रुवारी ते ६ मार्च कालावधीत होणाऱ्या कार्यक्रमास भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थानचे मठाधिपती महंत एकनाथ महाराज यांनी कंधार येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले,

श्री क्षेत्र उमरज येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमास अनंतश्री विभूषित व्दारकाशारदापीठाधीश्वर जगद्गुरु शंकराचार्य



स्वामी श्री सदानंद सरस्वतीजी महाराज श्री शारदापीठ, व्दारकाधाम ( गुजरात), आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते प.पु.श्री. देवकीनंदनजी ठाकूर महाराज (श्री वृंदावन धाम),साधू,संत,नागा साधु, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,पालकमंत्री अतुल सावे,खासदार,आमदार आदींची उपस्थिती राहणार आहे.भाविक भक्तांनी, नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थानचे मठाधिपती महंत एकनाथ महाराज यांनी केले आहे.श्री क्षेत्र उमरज येथे श्रीसंत नामदेव महाराज मठसंस्थानाच्या वतीने मठाधिपती महंत एकनाथ महाराज यांच्या पुढाकारातून धार्मिक सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमांची तयारी,विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम, विविध समित्या,आदींची माहिती मठाधिपती महंत एकनाथ महाराज यांनी कंधार येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.मंदिर बांधकाम पूर्ण झाल्याने कलशारोहण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

### या कार्यक्रमास अनेकांची उपस्थिती

महाराष्ट्रासह तेलंगणा, कर्णाटक, आंध्र प्रदेश आदी राज्यातून दररोज लाखापेक्षा अधिक भाविक भक्तांची उपस्थिती राहणार आहे.२७ फेब्रुवारी ते ६ मार्च या कालावधीत होणाऱ्या कार्यक्रमास भाविकांची गैरसोय होऊ नये.यासाठी सुरक्षा बंदोबस्त,आरोग्य सुरळीत विद्युत पुरवठा,बस वाहतूक सोय,कार्यक्रमाचे स्थळ,स्वच्छता,अग्नीशामक व्यवस्था आदीसाठी प्रशासनाचे सहकार्य मिळत आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार,उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप,कंधारचे तहसीलदार रामेश्वर गोरे,पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव आदींसह सर्व अधिकारी सहकार्य करत आहेत.आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचेही मोलाचे सहकार्य मिळत आहे.भाविक भक्तांनी या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन श्री क्षेत्र उमरज येथील श्रीसंत नामदेव महाराज मठसंस्थानाचे मठाधिपती महंत एकनाथ महाराज यांनी केले.यावेळी निलेश गौर,जगदीश धोंड आदींची उपस्थिती होती.

---

### एमबीबीएस ची विद्यार्थिनी कु.श्रुती दत्ता वसमतकर यांचा

# बुलढाणा अर्बन चे शाखा व्यवस्थापक केशवराव शेटे यांच्या वतीने लोह्यात सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



लोहा येथील सुप्रसिध्द शासकीय बांधकाम गुत्तेदार तथा सामाजिक कार्यकर्ते दत्ता भाऊ वसमतकर यांची कन्या कु.श्रुती दत्ता वसमतकर या विद्यार्थ्यांनी जिद्द मेहनत चिकाटी बाळगुन अभ्यासात सातत्य राखुन २०२४ मध्ये टीईटी मध्ये ६४०गुण घेऊन घवघवीत यश मिळवून वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरली व तिला परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे प्रवेश मिळाला. या आपल्या लोहा शहरातील गुणवंत विद्यार्थीनींचा गौरव व्हावा म्हणून लोहा येथील बुलढाणा अर्बन बँकेचे शाखा व्यवस्थापक केशवराव शेटे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कु.श्रुती यांचे वडील दत्ता भाऊ वसमतकर, आई सौ. सुवर्णा दत्ता वसमतकर,भाऊ श्रीधर दता वसमतकर, बुलढाणा अर्बन बँकेचे शाखा व्यवस्थापक केशवराव शेटे, मनसेचे जिल्हाध्यक्ष गजानन पाटील चव्हाण, पत्रकार संजय कहाळेकर, विलास सावळे, विनोद महाबळे, अशिष चव्हाण, मारोती वसमतकर, सुर्यकांत वसमतकर, भैय्यासाहेब जोंधळे आदी उपस्थित होते. सर्वांनी एमबीबीएस ची विद्यार्थिनी कु.श्रुती दत्ता वसमतकर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

---


# पुणे परिसरात उन्हाच्या झळा वाढल्या

## दिवसभर अंगाची लाही लाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

पुणे शहरात फेब्रुवारी महिन्यात अनपेक्षितपणे तापमानात वाढ झाली असून, उन्हाळ्यासारखी उष्णता जाणवत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शहराचे तापमान ३७ अंश सेल्सियसपेक्षा जास्त नोंदवले गेले आहे,जे सरासरीपेक्षा खूप जास्त आहे.या उष्णतेच्या लाटेमुळे दैनंदिन जीवनावर परिणाम झाला असून, थंड पेये आणि कुलिंग उपकरणांची मागणी वाढली आहे. वडगाव शेरी परिसरातील तापमान ३३.७ओउ सेल्सियस तापमान होते. वाढत्या तापमानामुळे दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे, त्यामुळे नागरिकांना थंड राहण्यासाठी




विविध उपाय करावे लागत आहेत.भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहील आणि लवकर कोणताही दिलासा मिळण्याची शक्यता नाही.

**कुलिंग उपकरणांची मागणी वाढली..**

एअर कंडिशनर , कूलर आणि पंख्यांची विक्री वाढली आहे. मध्यमवर्गीय कुटुंबे, ज्यांना एसी घेणे शक्य नाही, ते एअर कूलर आणि पारंपरिक थंड पद्धतींचा वापर करत आहेत. इलेक्ट्रॉनिक वस्तू विक्रेत्यांकडे मागणी ३०-४०% नी वाढली आहे.

**थंड पेये आणि सरबतांची मागणी**

उसाचा रस, नारळपाणी आणि लिंबू सरबत यांसारख्या थंड पेयांच्या स्टॉल्सवर मोठी गर्दी होत आहे. आले टाकून बनवलेला उसाचा रस विशेष लोकप्रिय ठरत आहे. बाटलीबंद पाणी आणि एनर्जी ड्रिंक्सची विक्रीही वाढली आहे.

लहान मुले आणि वृद्धांना उष्माघात आणि डिहायड्रेशनचा धोका आहे. भरपूर पाणी प्यावे , हलक्या रंगाचे कपडे घालावे.आणि सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत थेट सूर्यप्रकाशात जाणे टाळावे.

**- डॉ. ज्योती जाधव, वाघोली पुणे.**

---

# सार्वजनिक ठिकाणी फ्री वाय-फायच्या नावाखाली होऊ शकते तुमची फसवणूक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

बऱ्याचदा फ्री वाय-फाय या गोष्टीकडे अनेकजण आकर्षित होतात. इंटरनेटचे वाढते दर पाहता जर फ्रीमध्ये आपल्याला इंटरनेट मिळत असेल तर ते कोणाला आवडणार नाही. मात्र तुम्हाला माहिती आहे का ?या फ्री वाय-फायच्या नावाखाली तुमच्यासोबत घोटाळा होऊ शकतो. अलीकडेच, यूजीसी अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांना पब्लिक वाय-फायद्वारे पर्सनल किंवा प्रोफेशनल अकाउंट्समध्ये लॉग इन न करण्याचा सल्ला दिला आहे.

असे फ्री पब्लिक वाय-फाय युज करून तुम्ही तुमची प्रायव्हसी धोक्यात आणू शकता. याचा वापर करून लोक घोटाळे किंवा फसवणुकीला बळी पडू शकतात, असा इशारा यूजीसीने विद्यार्थ्यांना दिला आहे. अशात तुम्ही देखील मोफत म्हणजेच पब्लिक वाय-फाय वापरत असाल तर तुम्हाला खूप सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. तुमच्या छोट्याशा चुकीमुळे तुम्ही स्वतःला संकटात टाकू शकता.मोफत वाय-फाय साधारणपणे बस स्टॉप, रेल्वे, विमानतळ, कॅफे, रेस्टॉरंट आणि सार्वजनिक लायब्ररी या सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध आहे. युजर्स कोणत्याही सक्रिय डेटा प्लॅनशिवायही या ठिकाणी त्यांच्या मोबाइल, लॅपटॉप, टॅबलेट इत्यादींवर इंटरनेट वापरू शकतात. अशा वाय-फाय सेवेला पब्लिक वाय-फाय म्हणतात. फ्री वायफाय नेटवर्कशी कनेक्ट करण्यासाठी, एक सामान्य पासवर्ड आवश्यक आहे. बऱ्याच ठिकाणी पब्लिक वाय-फाय हे ओपन नेटवर्कवर ठेवले जाते, ज्यामुळे कोणीही त्यांच्या डिव्हाइसवर इंटरनेट वापरण्यास सक्षम असेल.

**फ्री वाय-फायचा धोका**

नावाप्रमाणेच, कोणीही त्यांचे डिव्हाइस पब्लिक वाय-फायद्वारे कनेक्ट करू शकतो. अशा परिस्थितीत या फ्री वाय-फायमध्ये घुसखोरी करणे हा हॅकर्ससाठी खेळ आहे. फ्री वाय-फाय सेवेत प्रवेश करून, ते कनेक्ट केलेल्या डिव्हाइसवर सहजपणे व्हायरस किंवा मालवेअर पाठवू शकतात. त्यामुळे पब्लिक वाय-फायमध्ये डेटा चोरी आणि हॅकिंगचा धोका अधिक प्रमाणात असतो. पब्लिक वाय-फाय सर्व्हिस फ्री असल्याने, त्याच्या सुरक्षा अपडेट्सकडे दुर्लक्ष केले जाते, ज्यामुळे हॅकर्सना कनेक्ट केलेल्या युजर्सच्या डिव्हाइसमध्ये प्रवेश करण्याची संधी मिळते. पब्लिक वाय-फाय द्वारे इंटरनेट वापरणाऱ्या लोकांनी फ्री वाय-फाय द्वारे आपल्या ई-मेल, बँकिंग इत्यादींमध्ये कधीही प्रवेश करू नये.

**कोणत्या गोष्टी करू नयेत**

फ्री वाय-फाय सर्व्हिस सामान्य नागरिकांसाठीच असते मात्र त्याचा वापर निष्काळजीपूर्वक करणे तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकते. अशा परिस्थितीत तुमचा फोन किंवा लॅपटॉप अगदी आवश्यक असल्याशिवाय कनेक्ट करू नका. तुम्ही पब्लिक वाय-फाय वापरत असल्यास, कोणतेही डिजिटल पेमेंट किंवा सोशल मीडिया प्स ओपन करू नका. फारच गरज असल्यास तुम्ही या फ्री वाय-फायचा वापर इंकॉग्निटो ब्राउझर मध्ये करा, या मोडमध्ये आपला डेटा सेव्ह केला जात नाही.

---

# कोट्यावधी रुपये खर्च करून सुद्धा केवळ अक्षम्य दुर्लक्षामुळे उस्माननगर मध्ये पाणी टंचाईची चिन्हे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

कंधार तालुक्यातील उस्माननगर येथील पाणी टंचाई समस्या केवळ जिल्ह्याला नव्हे तर सत्यमेव जयते कार्यक्रमामुळे संपूर्ण जगाला ठाऊक आहे. यावर्षीच्या उन्हाळ्यात पुन्हा एकदा पाणी टंचाई जाणवण्याची चिन्हे आहेत. यामुळे गावकऱ्यांच्या चिंता वाढल्या आहेत. ग्रामपंचायत, जीवन प्राधिकरणाच्या होणाऱ्या दुर्लक्षामुळे पाणी समस्या उग्र रूप धारण करण्याची शक्यता आहे. तत्कालीन राज्यसरकारने विशेष बाब म्हणून उस्माननगर येथील जीवघेण्या पाणी टंचाईच्या समस्येवर कोट्यावधी रुपयांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून उस्माननगर, शिराढोण, भूत्याचीवाडी तीन गावांसाठी वाढीव ग्रामीण पाणीपुरवठा योजना मंजूर केली. बारुळ येथील मानार जलाशय जवळील चिंचोली शिवारातून या योजनेतून पाणी पुरवठा करण्यासाठी काही कामही खर्च करून पूर्ण केले जात होते. उस्माननगर येथून जवळच असलेल्या शिराढोण मार्गावर असलेल्या खांडीच्या महादेव डोंगरावर पाण्याची टाकी, फिल्टर, ची निर्मिती करण्यात येत असताना



आजही येथील कामे अर्धवट, निर्माणाधीन अवस्थेत परंतु दुर्लक्षित आहेत असे चित्र दिसून येते आहे. मागील सरकारने लोकसहभागातून जलयुक्त शिवार अभियान सुरू केले यात गाव व परिसरात मोठ्या प्रमाणावर शेती, डोंगरमाथ्यावर पाण्याचा थेंब वाचवण्यासाठी परिश्रम घेतले परिणामी उस्माननगर येथील जमीनीतील पाणी पातळी वाढून कांही प्रमाणात पाणी समस्येवर उपाय सुद्धा मिळाला होता. जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून मात्र वेळेत योजना पूर्ण करण्यासाठी कुठल्याही प्रकारची तातडीने कामे करण्यात आली नाहीत. गावात कामे अर्धवट ठेवून तात्पुरते पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न केला होता. गावात मागेल त्याला नळजोडणी मुळे कुणाचाच पायपोस कुणाच्याच पायात नाही या प्रकारामुळे नळाला मागील अनेक महिन्यात पाणीच आले नाही. एकेकाळी गावात भीषण पाणी टंचाई मुळे गावकऱ्यांना जीव गमवावा लागला असताना आजही केवळ अक्षम्य दुर्लक्षामुळे पाणी समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. मागील भूतकाळ आठवून गावकरी चिंतेत असल्याचे दिसून येते आहे. आगामी उन्हाळ्यात तिव्र पाणी समस्या निर्माण होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. असे गावकरी मंडळींची मागणी आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904